MHJG060043742026

**फौजदारी किरकोळ अर्ज क्र.६१७/२०२६**
**गणेश किशन पाटील - वि- महाराष्ट्र शासन**
**आदेश निशाणी क्र.१ वर**

## निशाणी क्र.१ वर आदेश

अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज भारतीय नागरीक सुरक्षा संहीता, २०२३ चे कलम ५०३ प्रमाणे त्यांचे मालकीची बजाज पल्सर कंपनीची मोटारसायकल नोंदणी क्रं.एमएच-१९-ईएच-२१६६, चेसिस क्र.MD2B68BX4PWH21622, इंजिन क्र. DHXWPH-03729 ही जळगांव शहर पोलीस स्टेशन, जळगांव यांनी गुन्हा नोंदणी क्र.१७२/२०२६ मध्ये जप्त केलेले वाहन तात्पुरत्या स्वरुपात ताब्यात मिळणेकामी दाखल केलेला आहे.

२. तपासी अधिकारी यांनी खुलासा सादर केला की, सदरचे वाहन अर्जदार यांना योग्य अटी व शर्तीवर देण्यास त्यांची काही एक हरकत नाही, तरी पुढील आदेश होणेस विनंती आहे.

३. सहायक सरकारी अभियोक्ता यांनी त्यांच्या खुलाशात सादर केले की, जप्त वाहन हे गा.हा.भ. ची अवैध वाहतुक करतांना मिळुन आल्याने ते जप्त केलेले आहे. अर्जदार हा सदर गुन्ह्यात आरोपी आहे. जप्त वाहन परत दिल्यास अशाच प्रकारचा गुन्हा होवु शकतो. त्यामुळे अर्जदाराचा अर्ज नामंजुर करण्यांत यावा अशी विनंती केली आहे.

४. अर्जाच्या पृष्ठयर्थ अर्जदाराने जळगांव शहर पोलीस स्टेशन, जळगांव यांचेकडील प्रथम खबर अहवालाची प्रत, आधारकार्डची छायांकीत प्रत, वाहनाचे आर.सी. बुकाची प्रत, वाहन विमा पॉलीसीची प्रत अशी कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

५. अर्जासोबत दाखल असलेल्या कागदपत्रावरुन प्रथमदर्शनी सदर जप्त वाहन हे अर्जदार यांच्या नावाने असल्याचे व ते जप्त वाहनाचे मालक असल्याचे दिसुन येत आहे. तसेच आजपर्यंत कोणत्याही त्रयस्त इसमाने सदर जप्त वाहनाच्या मालकीबाबत दावा केलेला नाही.

६. भारतीय नागरीक सुरक्षा संहीता, २०२३ चे कलम ५०३ चे अवलोकन केले असता जेव्हा जेव्हा कोणताही पोलीस अधिकारी यांनी संपत्तीचे अधिग्रहण केल्याचे वृत्त या संहितेच्या उपबंधाखाली दंडाधिकारी यांना कळविण्यात आले असेल व चौकशी किंवा संपरिक्षेत अशी संपत्ती फौजदारी न्यायालयात आणली गेली नसेल तेव्हा अशा संपत्तीची विल्हेवाट करणे किंवा तिच्या कब्जास हक्कदार असलेल्या कोणत्याही व्यक्तीकडे तिची सपुर्दगी करणे याबाबत दंडाधिकारी आदेश देवू शकतील.

७. सदर कलम ५०३ अन्वये अधिग्रहीत केलेली संपत्तीचा कब्जा देत असतांना त्या संपत्तीचा हक्कदार म्हणजेचे मालकाबाबत चौकशी करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे अर्जदार याने नमुद केलेले जप्त वाहन हे त्याच्या मालकीची असल्याचे दाखल कागदपत्रावरुन स्पष्ट होत आहे.

८. तपासी अधिकारी यांच्या जबाबाचे अवलोकन केले असता, जप्त वाहन हे गुन्हयाच्या तपासाकामी आवश्यक नसल्याचे दिसुन येत आहे. अशा परिस्थितीत सदर जप्त वाहन हे जळगांव शहर पोलीस स्टेशन, जळगांव येथे उघडयावर पडले असून उन्हामुळे व पावसामुळे त्याचा रंग खराब होण्याची व गंज लागण्याची शक्यता आहे. असे असले तरी खटल्याच्या सुनावणीदरम्यान सदर वाहनाची आवश्यक्ता पडू शकते. त्यामुळे, खालील अटी व शर्तीवर अर्जदार यास सदर वाहनाचा तात्पुरता ताबा मालक या नात्याने अर्जदार यास देणे योग्य होईल. करिता, खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज खालील अटी व शर्तीवर मंजुर करण्यात येत आहे.

**अ–** जळगांव शहर पोलीस स्टेशन, जळगांव यांनी गुन्हा नोंदणी क्र. १७२/२०२६ मधील बजाज पल्सर कंपनीची मोटारसायकल नोंदणी क्रं.एमएच–१९–ईएच–२१६६, चेसिस क्र.MD2B68BX4PWH21622,

इंजिन क्र. DHXWPH–03729 हे वाहन अर्जदार **गणेश किसन पाटील** यांच्या ताब्यात रुपये ८०,०००/– च्या सुप्रतनाम्यावर देण्यात यावे.

**ब–** सदर वाहनाच्या स्वरुपामध्ये जसे की, रंग, आकार, कोणत्याही प्रकारे फेरबदल अथवा मोडतोड करणार नाही. तसेच, अर्जदार याने सदरचे वाहन कुणालाही विक्री करणार नाही, तारण ठेवणार नाही, बोजा निर्माण करणार नाही. तसेच, तपासी अधिकारी अथवा न्यायालयाने आदेशित केल्यास हजर राहण्याचे व तपासकामी अथवा खटल्याच्या सुनावणीदरम्यान मदत करेन असे बंधपत्र अर्जदार याने तपासी अधिकारी यांचेकडे सादर करावे.

**क–** अर्जदार याने वाहनाच्या सर्व कागदपत्रांच्या स्वाक्षांकीत प्रती तपासी अधिकारी यांचेकडे सादर कराव्यात.

२. अर्जदार याने भविष्यात सदर वाहनाचा वापर इतर कुठल्याही गुन्हयात करु नये.

३. तपासी अधिकारी यांना आदेश देण्यात येतो की, सदर जप्त वाहनाचा योग्य तो पंचनामा करुन घ्यावा. सदर वाहनाचे चारही बाजुंनी छायाचित्र काढून त्यावर अर्जदाराची स्वाक्षरी घ्यावी. तपासी अधिकारी यांनी बंधपत्र, छायाचित्र व पंचनामे दोषारोपत्रात समाविष्ट करावेत.

४. अर्जदार यांनी पंचनाम्यासाठी आवश्यक असणाऱ्या छायाचित्रांचा खर्च करावा.

सही/–
(एम.एम.निकम)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
(न्यायालय क्र.३)जळगांव

दिनांक :- ०५/०८/२०२६.